www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार २३ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### लढाऊ रूद्र, ध्रूव अन् चित्ता हेलिकॉप्टरच्या हवाई कसरती; 'कॅट्स'च्या ४१व्या तुकडीचा दीक्षान्त सोहळा थाटात

● नाशिक, सचिन कदम :

लढाऊ हेलिकॉप्टर म्हणून ओळखले जाणारे रूद्र, ध्रूव, चित्ता अन् चेतकच्या अंगावर शहारे आणणाऱ्या हवाई कसरतींनी उपस्थित लष्करी अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांच्या डोळ्यांची पारणे फेडली. हेलिकॉप्टरमधून युद्धभूमीवर उतरणारे सैनिक त्यांना पुरविण्यात येणारी रसद अन् शत्रूच्या छावणीवर भारतीय सैनिकांकडून चढविला जाणारा हल्ला असा युद्धभूमीचा थरार यावेळी 'कॅट्स'मध्ये अनुभवयास आला.

पान २ वर

### फ्लेमिंगोंच्या मृत्यूची वनविभागाकडून चौकशी; अपर मुख्य प्रधान वनसंरक्षकांची माहिती



● नवी मुंबई, भावना जैन :

दुबईहून मुंबईत येत असलेल्या एमिरेट्सच्या विमानाला घाटकोपर येथे फ्लेमिंगोची धडक बसली. याप्रकरणी वनविभागाने तत्काळ चौकशी सुरू केली असल्याचे राज्याचे अपर मुख्य प्रधान वनसंरक्षक एस. व्ही. रामाराव यांनी सांगितले.

पान २ वर

# निवासी डॉक्टरांचा मानसिक छळ

## आयएमए आक्रमक, राष्ट्रीय स्तरावर राबविणार मोहीम

● मुंबई, यश सावंत :

देशातील निवासी डॉक्टरांच्या मानसिक छळाबाबत इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) कनिष्ठ निवासी डॉक्टरांनी आक्रमक भूमिका घेत राष्ट्रीय स्तरावर मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. डेहराडून येथील एसजीआरआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या बालरोग विभागातील प्रथम वर्षाच्या निवासी डॉक्टरांच्या आत्महत्येमुळे पुन्हा एकदा अतिरिक्त कामाचे तास, मानसिक आरोग्य आणि वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ डॉक्टरांचा मानसिक छळ हे प्रश्न पुन्हा पुढे आले आहेत. त्यामुळे या विषयावर राष्ट्रीय स्तरावर मोहीम राबवून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न इंडियन मेडिकल असोसिएशनच्या डॉक्टरांनी घेतला आहे.




देहराडून येथील वैद्यकीय महाविद्यालयात नुकतीच एका निवासी डॉक्टरने आत्महत्या केली. या घटनेचा इंडियन मेडिकल असोसिएशन ज्युनियर डॉक्टरांच्या संघटनेने निषेध केला आहे. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरांना अजूनही ४० तास काम करावे लागते. तसेच वरिष्ठ डॉक्टरांकडूनही निवासी डॉक्टरांसोबत गैरवर्तन केल्याच्या घटना सर्रास घडत असतात. त्यामुळे डॉक्टर मानसिक तणावाचे बळी ठरून आत्महत्येचा मार्ग पत्करतात. या प्रश्नाकडे रुग्णालय प्रशासन व सरकारचे अनेकदा लक्ष वेधण्यात येऊनही वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरांचा छळ कायम आहे. त्यामुळे निवासी डॉक्टरांशी निगडीत असलेल्या या प्रश्नावर राष्ट्रीय स्तरावर आवाज उठविण्याचा निर्णय आयएमएच्या कनिष्ठ डॉक्टरांनी घेतला आहे. डॉक्टरांच्या मानसिक छळाबाबत राष्ट्रीय स्तरावर आंदोलन करून त्यावर ठोस निर्णय घेण्याची मागणी सरकारकडे करण्यात येणार असल्याचे असोसिएशनचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. इंद्रनील देशमुख यांनी सांगितले.

## मुंबई, ठाण्यात उष्णतेची लाट, कोकणात पावसाचा अंदाज

● ठाणे, विशेष प्रतिनिधी :



एकीकडे मान्सूनची चाहूल लागली असताना दुसरीकडे राज्यासह देशातील अनेक भागात उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. देशात पुढील 48 तासात कोकणात आणि विदर्भाच्या काही भागात पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातही पावसाचा अंदाज आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, आणि सोसाट्याचा वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, मान्सून अंदमान निकोबार बेटांवर दाखल झाला आहे, ही एक आनंदाची बातमी आहे. मान्सूनची चाहूल लागली असून देशात मान्सून लवकरच दाखल होण्याची शक्यता आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून दाखल होईल, असा अंदाज आहे.

पान २ वर

## 'मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक.." निवृत्त न्यायाधीश चित्तरंजन दास यांच्या वक्तव्याची सर्वत्र चर्चा

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश चित्तरंजन दास यांनी सोमवारी निवृत्ती घेतली. यावेळी त्यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असल्याचं जाहीर केलं. चित्तरंजन दास यांचं हे भाषण चांगलंच चर्चेत आलं. गेल्या काही वर्षांपासून ते कोलकाता उच्च न्यायालयात होते. त्याआधी ते ओडिशा उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते.

या कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले, "काही लोकांना हे आवडणार नाही. पण मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य होतो. हे मला या ठिकाणी मान्य करावे लागेल." त्यानंतर त्यांचं हे विधान चांगलंच चर्चेत आलं. यानंतर त्यांनी पुन्हा एकदा आपल्या विधानावर स्पष्टीकरण देत 'आरएसएसशी असलेलं आपलं नातं न सांगणं म्हणजे ढोंग होईल', असं म्हणत आपण केलेल्या विधानावर ते ठाम असल्याचं सांगण्याचा प्रयत्न केला. "काही लोकांना हे आवडणार नाही. मात्र, आज या ठिकाणी सांगू इच्छितो की, मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य होतो. मी त्या संघटनेला खूप काही देणे लागतो. मी संघाचा खूप ऋणी आहे. मी लहानपणापासून ते मोठा होईपर्यंत तेथे होतो. धाडस, प्रामाणिकपणा, सारखा दृष्टीकोन, देशभक्ती, कामाची भावना हे सर्व मी तेथे शिकलो. मात्र, माझ्या कामामुळे ३७ वर्षांपासून आरएसएसपासून दूर आहोत. त्याचा उपयोग मी कधी माझ्या कारकिर्दीत केला नाही.

पान २ वर

## "पालक म्हणून चुकलात, वडिलांची भूमिका व्यवस्थित पार पाडली नाहीत", न्यायालयाने सुनावलं, विशाल अग्रवाल यांना २४ मेपर्यंत कोठडी

● पुणे, अभिजित येरल्लू :

पुण्यात बेदरकारपणे पोर्श ही अलिशान गाडी चालवून दोघांचा जीव घेणाऱ्या अल्पवयीन मुलाच्या वडिलांना पुणे सत्र न्यायालयाने २४ मे पर्यंतची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. वकील असीम सरोदे यांनी यासंदर्भातील माहिती दिली. या प्रकरणाची सुनावणी संपल्यानंतर त्यांनी बुधवारी माध्यमांशी संवाद साधला. तसंच, न्यायलयाने अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल यांच्यावर ताशेरेही ओढले.

१९ मे रोजी पहाटे अडीचच्या सुमारास पुण्याच्या कल्याणीनगर परिसरात पोर्श या चारचाकी गाडीने दुचाकीला धडक दिली. या धडकेत अश्विनी कोस्टा आणि अनिश अवधिया हे जोडपे जागीच मृत पावले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अल्पवयीन मुलाच्या हाती गाडी दिल्यामुळे त्याच्या वडिलांना पोलिसांनी अटकही केली आहे. या प्रकरणी पुण्याच्या सत्र न्यायालयात बुधवारी सुनावणी पार पडली. अल्पवयीन मुलाच्या वडिलांना आज कडोकोट बंदोबस्तात पुणे सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. या सुनावणीत न्यायालयाने त्यांना २४ मेपर्यंत न्यायालयीन कोठडी



सुनावली आहे. याप्रकरणी माहिती देताना वकील असीम सरोदे म्हणाले, "या प्रकरणात वडील आरोपी आहेत. त्यांनी वडिलांची भूमिका व्यवस्थित पार पाडली नाही. गाडीवर नंबर नसताना, लायसन्स नसातनाही गाडी चालवायला दिली. १८ वर्षे नसताना पबमध्ये पाठवणं चांगल्या पालकांचं लक्षण नाही. बाल न्याय हक्कानुसार आपल्या पाल्याकडे दुर्लक्ष केलं आहे, हे त्याचंच लक्षण आहे की मुलावर नियंत्रण ठेवलं नाही. त्यामुळे कोर्टाने २४ तारखेपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली." अल्पवयीन मुलाच्या वडिलांसह बारचालक आणि व्यवस्थापक यांनाही तुरुंगात पाठवण्यात आलं आहे.

दारुबंदी कलम लावलं नाही

"कोणी अपघात करेल आणि त्याला काहीच होणार नाही ही न्यायाची असमानता आहे. आम्ही कोर्टात सांगितलं की मुलाकडे परवाना नसतानाही त्याला गाडी चालवायला देणं हे पालक म्हणून अपयश आहे. त्यामुळे त्यांची चौकशी झाली पाहिजे. पालकांनी मुलाकडे लक्ष दिलं नाही. कायद्याचे एक-दोन मुद्दे आहेत.

पान २ वर

## अस्वच्छता पसरविणाऱ्या ८१ जणांवर महापालिकेची कारवाई

● नागपूर, नितीन देवळेकर :

महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर कारवाईची मोहिम सुरू केली आहे. या अंतर्गत उपद्रव शोध पथकाने एकाच दिवशी ८१ जणांवर कारवाई करून ५०५००रुपयाचा दंड वसूल केला आहे. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते हे लगतच्या परिसरात अस्वच्छता करतात. अशा २४ लोकांवर कारवाई करून ९६०० रुपये दंड वसूल केला आहे. चार लोकांवर रस्त्यावर कचरा टाकल्या प्रकरणी कारवाई करून ४००



रुपये दंड वसूल केला आहे. तर १२ दुकानदारांनी रस्त्यावर कचरा टाकल्याने ४८०० रुपये दंड वसूल केला आहे. मंगल कार्यालयाकडून रस्त्यावर कचरा टाकल्या प्रकरणी कारवाई करून २ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

पान २ वर

## "बालन्याय मंडळाचा...", अमृता फडणवीसांची संतप्त प्रतिक्रिया

● मुंबई, रोहित जैसवाल :

पुण्यात पोर्श या महागड्या गाडीखाली दोन तरुणांचा हकनाक बळी गेला आहे. अल्पवयीन चालक परवाना नसताना बेदरकारपणे गाडी चालवत होता. जवळपास १५० किमी वेगाने या गाडीने एका दुचाकीला उडवले. या दुचाकीवर एक जोडपं होत. या जोडप्यापैकी तरुणीचा जागीच मृत्यू झाला तर, तरुणाचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणावरून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी याबाबत एक्सवरून पोस्ट केली आहे.



१९ मेच्या पहाटे अडीचच्या सुमारास पुण्याच्या कल्याणीनगर परिसरात नंबरप्लेट नसलेल्या पोर्श कारने एका मोटरसायकलला धडक दिली होती. या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला होता. या अपघातानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर रविवारी दुपारी त्याला विशेष हॉलिडे कोर्टात हजर करण्यात आलं. पोलिसांनी त्याची रवानगी कोठडीत करण्यात यावी अशी मागणी केली. तसंच आरोपी साडेसतरा वर्षांचा आहे, त्यामुळे त्याला प्रौढ समजून खटला चालवला जावा, अशी मागणीही करण्यात आली. मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली तसेच या आरोपीला जामीन मंजूर केला. ३०० शब्दांचा निबंध लिहून देणे, आरटीओला सहकार्य करणं, अपघातग्रस्तांना मदत करणे आदी अटींवरून त्याला जामीन मंजूर करण्यात आल्याने महाराष्ट्रभर संताप व्यक्त करण्यात आला.

पान २ वर

### बालन्याय मंडळाच्या निकालावर फडणवीसांची नाराजी

कल्याणीनगर अपघात प्रकरणाचे पडसाद उमटू लागल्यावर राज्याचे गृहमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी तातडीने पुण्यात येऊन पोलिसांकडून आढावा घेतला. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास गांभीर्याने केल्याचे ते म्हणाले. पोलिसांनी तपास अहवाल सादर केल्यानंतरही आरोपी मुलाला जामीन देण्याचा बालन्याय मंडळाचा निर्णय धक्कादायक असल्याचे सांगत त्यांनी नाराजी व्यक्त केली. पबमध्ये होणारे गैरप्रकार लक्षात घेता यापुढे परवानगी देण्याचे धोरण बदलले जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

## कोकण रेल्वेत दर दिवशी विनातिकीट प्रवाशांकडून नऊ लाख रुपये दंड वसूल



● रायगड, दिगंबर जाधव :

कोकण रेल्वेमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत असून गेल्या काही महिन्यांपासून कोकण रेल्वे प्रशासन सातत्याने तिकीट तपासणी मोहीम राबवत आहे. या मोहिमेदरम्यान एप्रिल २०२४ मध्ये प्रतिदिन सरासरी ५०४ विनातिकीट प्रवाशांना पकडण्यात आले असून त्यांच्याकडून सरासरी सुमारे ९ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

पान २ वर

## मेळघाटात हंडाभर पिण्याच्या पाण्यासाठी जीवघेणी पायपीट, गावात टँकर येताच उडते झुंबड

● अमरावती, विशाल पाटील :

हिरव्यागार निसर्गाचा व मनाला भुरळ घालणारा अद्भूत नजरा म्हणजे मेळघाट. निसर्गाच्या सानिध्यात दडलेल्या या मेळघाटाची ओळख त्याच्या सौंदर्याने देशभरात आहे. परंतु या मेळघाटाच्या नशिबी आलेले बालमृत्यू, माता मृत्यू, कुपोषण, बेरोजगारी असे अनेक भोग मात्र स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतर सुटले नाही. अनेक सरकारे बदलली, पण मेळघाटाच्या कवेला घट्ट पकडून असलेला पाणी टंचाईचा भोग मात्र आजही कायम आहे. हंडाभर पाण्यासाठी डोंगर दऱ्यातून एक किलोमीटरचा प्रवास करणाऱ्या या



महिलांची व्यथा जाणून घेऊया.

दुपारचे दोन वाजलेत, वरुन सूर्य जणू आग ओकतोय, अशा परिस्थितीत डोंगर दऱ्यातून वाट काढत पाण्यासाठी दगड गोट्यांना तुडवत दीड किलोमीटर चालत येणाऱ्या या महिला आहेत. मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील खडीमल गावात दरवर्षी मार्च महिला लागला की या महिलांचा असाच जीवघेणा प्रवास सुरु होतो. गावाबाहेरील विहिरीत टँकरने पाणी आणून खाली केले तर या विहिरीतून पाणी भरायला मिळले. मात्र या विहिरीत टँकरने पाणी टाकले नाही तर हंडाभर पाण्यासाठी 3 ते 4 किलोमीटरचा प्रवास आदिवासी महिलांना करावा लागतो.

खडीमल गावात पाणी टंचाईत देशपातळीवर चर्चेत आहे. मात्र या ठिकाणी घोटभर पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो. या ठिकाणी गावात टँकर आला की भीषण अशी गर्दी पाणी भरण्यासाठी दिसून येत आहे. त्यामुळे या गावात पाणीबाणी निर्माण झाली आहे.

पान २ वर

## घाटकोपर दुर्घटनेच्या तपासासाठी 'एसआयटी', भावेश भिंडेच्या कार्यालयातून कागदपत्रे जप्त

● मुंबई, विशाल कारंडे :

घाटकोपर येथील जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे. मुंबई गुन्हे शाखेचे सहआयुक्त लखमी गौतम यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.



दरम्यान, भावेश भिंडेच्या कार्यालयातून कागदपत्रे जप्त करण्यात आली असून त्यानुसार तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. घाटकोपर दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला होता.

एसआयटीच्या पथकामध्ये एकूण ६ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांच्या देखरेखीखाली गुन्हे शाखेच्या कक्ष-७ चे प्रभारी निरीक्षक महेश तावडे पथकाचे नेतृत्व करणार आहेत तर, पोलीस निरीक्षक आत्माजी सावंत हे या प्रकरणाचे तपास अधिकारी आहेत.

पान २ वर

# संपादकीय

## गतिमान अर्थजगत

आपण आज आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहात आहोत. इथपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक आर्थिक स्थित्यंतरे झालेली आहेत. जुना काळ ते आताचा काळ यातही बराच फरक पडला आहे. त्याचा नव्याने घेतलेला धांडोळा

भारतीय खंड प्रदेशात सामाजिक व्यवस्था चार पुरुषार्थ सूत्रावर निर्मित झाली. त्यामध्ये धर्म / अर्थ / काम आणि मोक्ष ही जीवनाची सूत्रे सांगितलेली आहेत. यामध्ये या चार सूत्रांचा अर्थ सोयीस्करपणे वेगवेगळा लावण्यात आल्याने बरेच संभ्रम निर्माण झाले. पण खर्या अर्थाने आजच्या जागतिकीकरण व व्यापारी युगात यामधील अर्थ, या सूत्राचा संदर्भ पैसा / व्यापार / यातून विकास असाच प्रतिबिंबित होतो. मग पैसा कमवायला काही पायर्या व चालीरीती बनत गेल्या. त्यातील धर्मानुसार रचना तयार झाली. यामध्ये कर्म म्हणजे काम करण्याची पद्धत, त्यानुसार बदलत गेलेली मानवाची जीवनशैली !

त्याच अनुषंगाने जन्माधिष्ठ व्यावसायिक रचना स्थापित होऊन, जातीय व्यवस्थेचा मूलाधार निर्माण झाला. त्या तत्त्वानुसार शारीरिक श्रम एका वर्गाच्या वाट्याला आले. त्यातूनच पुढे गुलामगिरीची प्रथा रुजू होत केली. समाजात कामानुसार उतरंडी निर्माण झाल्या. एका वर्गाकडे जन्मानुसार हक्क व संपत्ती बहाल करण्यात येत असे! भारतीय खंडप्रदेशामध्ये चातुर्वर्णी व्यवस्था निर्माण झाल्याने, त्यानुसार धर्म रचना आणखी बळकट होत गेली. ब्राह्मण / क्षत्रीय/ वैश्य / शूद्र अशी वर्गवारी तयार झाली. विद्या व शिक्षण हे ब्राह्मणाचे बळ व हक्क म्हणून पुढे आले. तर वैश्य यांनी अर्थव्यवहार व व्यापार करावा असा समज होत गेला. शूद्रांनी सर्वांची सेवा करावी हेच त्यांचे कर्तव्य असे मानले गेले. या सर्वांचे रक्षण करण्यासाठी क्षत्रिय हा वर्ग तयार झाला. क्षत्रिय राजकर्ते, युद्धकर्ते आणि प्रशासक होऊ लागले.


या व्यवस्थेनुसार वर्ण परिवर्तन म्हणजे एका वर्णातून दुसर्या वर्णाचा हक्क बाधित करणे अर्थात ओढून घेणे कदापि शक्य नव्हते. समाजव्यवस्थेमुळे असे परिवर्तन समाज स्वीकारत नसे. यामुळेच वर्णव्यवस्था आणखी बळकट होत गेली. मानवी शोषण त्याचबरोबर पैसा / राजसत्ता / सामाजिक व्यवस्था एका वर्गाच्या हाताकडे जाऊ लागली. काही शतकांअगोदर पूर्ण राजेशाही आधीन व्यवस्था असा समाज होता; पण 12व्या शतकानंतर वेगवेगळया संतांचे प्रबोधन / धर्माविषयी विचार आणि राजकर्ते यांचा सुरेख संबंध साधला जाऊन राजे व संत, महात्मे यांना प्रतिष्ठा प्राप्त झाली.

जसजशी मानवाची जीवनशैली बदलत गेली तशी आरामदायी जीवनशैलीकडे वाटचाल होऊ लागली. मग खर्या अर्थाने पंधराव्या शतकानंतर व्यापारी क्रांती त्याचबरोबर 18व्या शतकातील औद्योगिक क्रांतीचा उदय झाला. यामुळे औद्योगिक व क्रांतिकारी बदल, त्यातून आर्थिक प्रश्नांची मानवापुढे साखळी तयार होऊ लागली. आर्थिक विचारांची विकासधारा जगभर रुजवण्याचा प्रयत्न करण्यात येऊ लागला. मग या भूमिकेला मोठी गती मिळत गेली. माणसाच्या आर्थिक विचाराला व अर्थप्राप्तीला वेगवेगळया दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी तयार झाली. 19व्या शतकात व्यापाराची कवाडे अनेक देशांनी खुली केली. त्यामुळे एकंदरीत जगातील व्यापारपेठेत अनेक देशांना व्यापाराच्या संधी निर्माण झाल्या. त्यामध्ये युरोपियन देश अग्रेसर असत त्याचबरोबर अमेरिकेचाही आर्थिक उदय झाला.

रचनात्मक बदल / उत्पादन / रोजगार आणि राहणीमान याचा मेळ घालताना अर्थव्यवस्थेत शेती हाच मुख्य घटक भारतामध्ये बदलत गेला. एकंदरीत जुन्या रचनात्मक बदलाची एक प्रकारे कोंडी फोडण्यात आली. यातूनच वस्तुविनिमय व्यवस्था

व्यावसायिक/ सामाजिक वितरण थोडं ढासळत गेलं. औद्योगिक क्रांती तसेच व्यापारी क्रांती यामुळे सर्वांना यामध्ये संधी निर्माण होऊ लागल्या. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की भारत देशाची अर्थव्यवस्था अत्यंत वेगाने वाढत असून याकडे जगभराचे लक्ष लागलेले आहे. विशेषतः वर्णव्यवस्था त्याचबरोबर चातुर्वर्ण्य व्यवस्था याला पूर्णपणे छेद केवळ आणि केवळ आर्थिक प्रगतीमुळे आणि आर्थिक स्थित्यंतरामुळे मिळत गेला.

आज कोणत्याही जातिधर्मातील व्यावसायिकाला कोणत्याही व्यवसाय उद्योगांमध्ये पडता येते. त्याचबरोबर आरक्षणांनी काही प्रमाणात सर्व वर्गांनासुद्धा संधी मिळत गेल्या. यामुळे गतिमान अर्थव्यवस्था होण्यास एक मोठा हातभार लागलेला आहे. एखाद्या विशिष्ट समाजामध्ये/ जातीमध्ये जन्म घेतला म्हणून पाप केले काय ? हे रडगाणं आता राहिलेले नाही. खुल्या झालेल्या या आर्थिक बाजारामध्ये आपण उडी घेऊन चांगल्या प्रकारे व्यावसायिक व सामाजिक प्रगती करावी जेणेकरून आपली भारतीय अर्थव्यवस्था आधुनिकीकडे वळत जाईल.



### आजची चित्रोळी

बेगमी गुरांची गंज लाऊनी केली
कडब्याने गंज शिगोशिगच भरली
शेतकरी जाणे व्यथा मुक्या जिवांच्या
अवलंबून गरजा त्यावरी जगण्याच्या

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### फ्लेमिंगोंच्या मृत्यूची वनविभागाकडून चौकशी...

२० मे रोजी रात्री ८.४० वाजता घाटकोपर-अंधेरी लिंक रोड, लक्ष्मीनगर-पंतनगर भागात विमानाला धडकून फ्लेमिंगो ३९ पक्षी मृत्युमुखी पडल्याची माहिती मिळताच वन विभागाच्या ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत बहादुरे, त्यांचे सहकारी तत्काळ घटनास्थळी पोहोचून पाहणी सुरू केली. त्यानंतर विभागीय वन अधिकारी दीपक खाडे, मुंबई कांदळवन विभागाचे सहायक वनसंरक्षक विक्रांत खाडे हे कर्मचाऱ्यांना घेऊन अपघातस्थळाची पाहणी करून २९ मृतपक्षी ताब्यात घेतले. २१ मे रोजी सकाळी पुन्हा पाहणी केली असता आणखी १० मृत पक्षी सापडले. या सर्व मृत पक्ष्यांचे ऐरोलीतील वन विभागाच्या सागरी-किनारी जैवविविधता केंद्रात शवविच्छेदन करण्यात येत आहे.

या संपूर्ण घटनेचा तपास विभागीय वन अधिकारी दीपक खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई कांदळवन विभागाचे सहायक वनसंरक्षक विक्रांत खाडे करीत असल्याचे रामाराव यांनी स्पष्ट केले आहे. नॅट कनेक्टच्या तक्रारीवर मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केलेली मॅन्ग्रोव्ह समिती २९ मे रोजी या तलावाची तपासणी करणार आहे, तर केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्रालयानेही राज्य पर्यावरण विभागाला चौकशी करून अहवाल देण्यास सांगितल्याचे नॅट कनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले. सागर शक्तीचे नंदकुमार पवार यांनी उरण तालुक्यातील बेलपाडा, भेंडखळ आणि पाणजे पाणथळीच्या जागा सिडकोने पायाभूत सुविधांसाठी भाड्याने दिल्याने ती नष्ट होत असल्याचे सांगितले. पाणथळींच्या ठिकाणी फ्लेमिंगो येतात, असे पक्षीप्रेमी ज्योती नाडकर्णी म्हणाल्या. या पक्ष्यांचा त्यांच्या अधिवासावर हक्क आहे, ज्यापैकी मुंबईची खाडी एक महत्त्वाचा भाग आहे, असे खारघरचे कार्यकर्ते नरेशचंद्र सिंग यांनी सांगितले.

### 'मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक..''...

मी संघाच्या सदस्यत्वाचा वापर करून प्रगती केली नाही. कारण ते माझ्या तत्वांच्या विरुद्ध आहे. सगळयांना समान वागणूक दिली. मग तो श्रीमंत असो किंवा गरीब, साम्यवादी असो किंवा भाजपाचा, काँग्रेसचा किंवा तृणमूल काँग्रेसचा सदस्य असो, अशा सर्वांना समान वागणूक दिली", असं चित्तरंजन दास यांनी आपल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात म्हटलं आहे.

### लढाऊ रूद्र, ध्रूव अन् चित्ता हेलिकॉप्टरच्या...

निमित्त होते, गांधीनगर येथील कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूलच्या (कॅट्स) प्रशिक्षणार्थी वैमानिक, प्रशिक्षक आणि आरपीएस अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या ४१व्या तुकडीच्या दीक्षान्त सोहळयाचे.बुधवारी (दि.२२) सकाळी येथील लष्करी हवाईतळावर आर्टीलरी सेंटरमधील बॅन्डपथकाच्या धूनवर प्रशिक्षणार्थींच्या तुकडीच्या दिमाखदार संचलनाने सोहळयाला प्रारंभ झाला. अध्यक्षस्थानी आर्मी एव्हीएशन कोर चे महानिर्देशक व कर्नल कमांडन्ट अतीविशिष्ट सेवा मेडल लेफ्टनंट जनरल अजय कुमार सुरी हे होते. प्रमख पाहुणे म्हणून ब्रिगेडिअर सचिन दुबे, कर्नल डी.के चौधरी उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्रासह एव्हिएशन विंग्स, क्वॉलिफाइड फ्लाइंग इन्स्ट्रक्टर 'बॅच' आणि आरपीएएस विंग बॅच देऊन गौरविण्यात आले. तुकडीत २३लढाऊ वैमानिक, ८ लढाऊ हेलिकॉप्टर इन्स्ट्रक्टर, ७ आरपीएएस इन्स्ट्रक्टर आणि ४ मानवविरहित आरपीएएस विमानाचे वैमानिक असे एकुण ४२ अधिकाऱ्यांचा समावेश होता.

कॅ.आशिक कृष्णकुमार (फ्लेजिंग ट्रॉफी), कॅ. इशांत चांदेवाल (पी.के गौर स्मृतीचिन्ह), कॅ. आशिष रांगी (सिल्वर चिता व एस.के शर्मा ट्रॉफी),कॅ. विस्मय भागवत, मेजर शशिकांत (ग्राउंड सब्जेक्ट) मेजर सुधांशु शर्मा (मे.प्रदीप अग्रवाल ट्रॉफी ), कॅ. कार्तिक शर्मा (आरपीएएस मेरिट प्रथम), मेजर आशीत आनंद (फ्लाइंग इन्स्ट्रक्टर ओव्हरऑल मेरिट-प्रथम) यांना विशेष व उत्कृष्ट अशा उल्लेखनीय कार्य प्रशिक्षणादरम्यान केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

सुरक्षित उड्डाण हेच प्रत्येक लढाऊ वैमानिकाचे ध्येय असले पाहिजे. हेलिकॉप्टर उड्डाणादरम्यान नियंत्रण कौशल्य हे महत्वाचे असते. युद्धभूमीवर किंवा नैसर्गिक आपत्तीच्यावेळी बचावकार्यात योगदान देताना वैमानिकांनी सुरक्षेला सर्वोच्चस्थानी ठेवावे. धोक्याची लाल रेषा कधीही ओलांडू नये. प्रशिक्षणात घेतलेले धडे व एसओपीचा विसर पडू देऊ नये. उज्ज्वल आर्मी एव्हिएटर म्हणून स्वत:ला सिद्ध करण्यासाठी या प्रशिक्षणाचा पुढे मोठा फायदा तुम्हाला करिअरमध्ये होईल. कॅट्स दिवसेंदिवस प्रगतीचे टप्पे गाठत असून लढाऊ हेलिकॉप्टर उड्डाणासह एकुण १७ अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देत उत्कृष्ट प्रशिक्षण संस्था म्हणून आपला आलेख उंचावत आहे, याचा अभिमान वाटतो.

### मेळघाटात हंडाभर पिण्याच्या पाण्यासाठी...

गेल्या तीन महिन्यापासून या गावातील सर्वच पाण्याचे स्रोत आटले आहे. तर गावात पेयजल योजना नाही. हरघर नल ही योजना या गावात अद्यापही नाही. त्यामुळे घरोघरी नळ या योजनेचा दावा या गावात फेल झाला आहे. हे भयानक दृश्य एकट्या खडीमल गावचं नाही. मेळघाटातील अशा अनेक गावातील महिला पाण्यासाठी डोंगर दऱ्यातून जीवघेणी कसरत करावी लागते. डोक्यावर दोन हंडे पाणी घेऊन अनेक महिला अनवाणी पायावरुन ऊन अन् खालून दगड तुडवत डोंगर माथ्यावर चढाई करताना दिसत आहे. यात अनेक वृद्ध महिला असल्याने अनेकजण पाय घसरुन खाली पडल्याच्या घटना घडली आहे. अमरावती जिल्ह्यातील 14 तालुक्यांपैकी 10 पाणीटंचाईग्रस्त 65 गावांतील नागरिकांची तहान अधिग्रहित करण्यात आलेल्या 49 विहिरी आणि 29 बोअरवेलच्या पाण्यावर भागविली जात आहे. संबंधित गावातील पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत येत्या 30 जूनपर्यंत विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा परिषद पाणी पुरवठाचे कार्यकारी अभियंता सुनिल जाधव यांनी दिली.

### अस्वच्छता पसरविणाऱ्या ८१ जणांवर...

वाहतूकीचा रस्ता मंडप टाकून अडविल्या प्रकरणी ५ लोकांवर कारवाई करून ११५०० रुपये दंड वसूल केला आहे. रस्ता, फुटपाथ, मोकळया जागेत बांधकामाचा मलबा टाकल्याने ३ जणांवर कारवाई करून ११ हजार रुपये दंड वसूल केला आहे.

प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवी बाळगणाऱ्या तीन आस्थापनांवर कारवाई

मनपाच्या उपद्रव शोध पथकाने प्रतिबंधक प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्या तीन आस्थापनांवर कारवाई करून १५ हजार रुपये दंड वसूल केला आहे.

### "पालक म्हणून चुकलात, वडिलांची भूमिका...

या प्रकरणात दोन एफआयआर असणेही बेकायदा आहे. आतापर्यंत चर्चा सुरू आहे. दारुबंदी कायद्याचं कलम लावलं नव्हतं", असंही असीम सरोदे म्हणाले.

विशाल अग्रवाल यांच्यावर शाईफेक

वंदे मातरम संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आरोपीच्या तोंडावर शाईफेक करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी कार्यकर्त्यांना अडवलं आणि आरोपी बचावला. दरम्यान, कार्यकर्ते शाईफेक करू शकले नसले तरी त्यांनी पोलिसांच्या वाहनासमोर उभे राहून जोरदार घोषणाबाजी केली. वंदे मातरम संघटनेचे कार्यकर्ते म्हणाले, "आरोपीला मोक्का या कायद्याअंतर्गत अटक केली पाहिजे. या बिल्डरवर याआधी अनेक गुन्हे दाखल आहेत आणि आता त्याच्या मुलाने हा किळसवाणा प्रकार केला आहे."

### कोकण रेल्वेत दर दिवशी विनातिकीट...

उन्हाळयाच्या सुटीनिमित्त मोठ्या संख्येने नागरिक कोकणात जातात. तसेच कोकणातून मुंबईकडे प्रवास करणाऱ्यांची संख्याही अधिक आहे. मात्र अनेक प्रवासी विनातिकीट प्रवास करीत असल्याचे उघडकीस आले आहे. या प्रवाशांमुळे तिकीटधारक प्रवाशांचा प्रवास गैरसोयीचा होत होता. त्यामुळे एप्रिल महिन्यात तिकीट तपासणी मोहीम राबवून एकूण १५ हजार १२९ प्रवासी तिकीटाविनाच प्रवास करीत असल्याचे आढळले होते. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून एकूण दोन कोटी ६९ लाख ८५ हजार २५६ रुपये दंड वसूल करण्यात आला.

कोकण रेल्वेवरील अनियमित/अनधिकृत प्रवाशांकडून वसूल करण्यात आलेला हा आतापर्यंतचा सर्वाधिक दंड आहे, असे कोकण रेल्वेतील अधिकाऱ्यांनी सांगितले. भविष्यात कोकण रेल्वेच्या संपूर्ण मार्गावर प्रभावीपणे तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी गैरसोय टाळण्यासाठी योग्य आणि वैध तिकीट घेऊनच प्रवास करावा, असे आवाहन कोकण रेल्वेकडून करण्यात आले आहे.

### घाटकोपर दुर्घटनेच्या तपासासाठी...

घाटकोपर जाहिरात फलकाचे व्यवस्थापन करण्यासाठी चार ते पाच कोटी रुपये लागत असल्याचे सांगण्यात येत असल्याने भिंडेच्या व्यवसायाची आर्थिक बाजू तपासली जात आहे. परवानगी कोणी दिली? प्रमाणपत्रे कोणी दिली? याचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

आतापर्यंत भिंडे याच्या मुलुंड येथील कार्यालयातील दोन ते तीन कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविण्यात आले असून अन्य जणांचे जबाब नोंदविण्यात येणार आहेत. भिंडेच्या बँक खात्याचा लेखाजोखा, 'इगो प्रायव्हेट लिमिटेड'सह त्याच्या बँक खात्यातून झालेल्या व्यवहाराची अधिक माहिती घेण्यात येत आहे. 'एसआयटी'कडून बँकांसोबत पत्रव्यवहार करण्यात येत आहे. हे पथक मंगळवारी व्हीजेटीआय (वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट) येथे गेले.

### "बालन्याय मंडळाचा", अमृता फडणवीसांची...

एखाद्या अपघतात दोघांचा मृत्यू झाला आणि त्याला जामिनावर सोडवण्याकरता फक्त निबंध लिहिण्याची शिक्षा देणं म्हणजे कायद्याचा अपमान असल्याचा सूर जनसामान्यातून उमटू लागला. आता यावर अमृता फडणवीस सुद्धा व्यक्त झाल्या आहेत. "अनिश अवाधिया आणि अश्विनी कोस्टा यांच्या कुटुंबीयांप्रती माझ्या संवेदना आहेत. आरोपी वेदांत अग्रवालला कठोर शिक्षा झाली पाहिजे. बालन्याय मंडळाचा निषेध", अशा शब्दात अमृता फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे.

### मुंबई, ठाण्यात उष्णतेची लाट, कोकणात...

मुंबई, ठाण्यात उष्णतेचा यलो अलर्ट

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह उपनगरात आणि ठाणे, पालघरमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याचा अंदाज आयएमडीने व्यक्त केला असून उष्णतेचा यलो अलर्ट दिला आहे. याशिवाय, सिंधुदूर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव आणि कोल्हापूरमध्येही उकाडा कायम राहण्याची शक्यता आहे. दोन दिवस हा उकाडा कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

मुंबई, ठाणे, पालघरमध्ये उन्हाचा कडाका

पुढील 48 तासांसाठी मुंबई शहर आणि उपनगरात सकाळच्या वेळी आकाश अशंतः ढगाळ वातावरण, तर दुपारी आणि संध्याकाळी निरभ्र आकाश राहील. मुंबई शहर आणि उपनगरात उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. मुंबईत कमाल तापमान 35 अंश सेल्सिअस आणि किमान तापमान 29 अंश सेल्सिअसच्या आसपास असेल, असं आयएमडीने म्हटलं आहे.

## चित्रपटांचा 'दुष्काळ'! ४५० थिएटर २६ मे पर्यंत बंद करण्याची नामुष्की

ओटीटीवर रिलीज झाल्यानंतरही 'मैदान','लापता लेडीज','आवेशम' हे सिनेमे अजूनही थिएटरमध्ये सुरु आहेत. नवीन सिनेमे अजूनही रिलीज न झाल्यामुळे थिएटर मालकांवर जुनेच सिनेमे सुरु ठेवण्याची वेळ आलीये. सिनेमांच्या या दुष्काळामुळे थिएटर मालकांवर आता ४५० थिएटर बंद करण्याची नामुष्की ओढावली आहे.

ट्रेड एक्स्पर्टच्या म्हणण्यानुसार, थिएटर इंडस्ट्रीवर मोठं संकट ओढावलं असून थिएटर मालकांवर जुने सिनेमे चालवण्याशिवाय कोणताही पर्याय उरला नाहीये कारण नवीन कोणताच सिनेमा अजून रिलीज झाला नाहीये. त्यामुळे अगदी क्षुल्लक नफा आणि कमी प्रेक्षकसंख्येमध्ये त्यांना थिएटर्स सुरु ठेवावे लागत आहेत.

उपरोधाने बघायचं झालं तर यातील बऱ्याच फिल्म्स आता थिएटरमध्ये ५० दिवस पूर्ण करतील पण त्या दृष्टीने त्यांची कमाई तितकी झाली नाहीये. उदाहरणार्थ, लापता लेडीजने शेवटच्या आठवड्यात फक्त १८.५९ करोड इतकी कमाई केली आणि मैदान सिनेमाने ५१.३९ करोड कमावले. साधारणतः बॉक्स ऑफिसवरील अशा कमाईनंतर सिनेमे एका आठवड्याच्या आत उतरवले जातात.

"आता याक्षणी सिनेइंडस्ट्रीकडे काहीच पर्याय नाहीये. मागील काही आठवड्यांमध्ये थिएटरमध्ये जे सिनेमे रिलीज झाले ते किमतीच्या मानाने कमाई करण्यात अयशस्वी ठरले." असं मुजफ्फर नगरमधील माया थिएटरचे एमडी प्रणव गर्ग यांनी सांगितलं. पुढे ते म्हणाले,"आम्ही फक्त लापता लेडीज, मैदान यांसारखे वेगवेगळ्या विषयांवरील सिनेमे थिएटर्समध्ये सुरु ठेवून आम्हाला काही प्रेक्षकसंख्या मिळेल आणि लोक निराश होऊन परत जाणार नाही अशी आशा ठेवून शकतो."

## बुद्ध पौर्णिमा



आज २३ मे, आज वैशाख पौर्णिमा आजच्याच दिवशी भगवान गौतम बुद्धांचा महामाया व राजा शुद्धोदन यांचा पुत्र म्हणून लुम्बिनी वनातील शाल वृक्षाखाली जन्म झाला होता म्हणून वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा असेही म्हणतात. ही तिथी वर्षातील सर्वात पवित्र आणि महत्वाची तिथी मानली जाते. बुद्ध पौर्णिमा आणखी तीन कारणांसाठी पवित्र मानली जाते ती म्हणजे याच दिवशी तथागत भगवान गौतम बुद्धांचा जन्म झाला होता, याच दिवशी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि याच दिवशी बुद्धांचे महानिर्वाण झाले होते म्हणून या पौर्णिमेला त्रिगुणी पौर्णिमा असेही म्हणतात. बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नाही तर जगातील १८० हुन अधिक देशात साजरी केली जाते. भारत, चीन, जपान, नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड, श्रीलंका, मलेशिया, व्हिएतनाम, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, इंडोनेशिया या देशात तर बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जगातील सर्व बौद्ध धर्मीय बांधव बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करतात. बुद्ध पौर्णिमेला बोध गया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात. बौद्ध धर्माच्या धर्मग्रंथाचे वाचन, पठण केले जाते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध पौर्णिमा साजरी केली गेली. २७ मे१९५३ रोजी भारत सरकारने बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. आज बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक स्वरूप आले आहे. भारतातील बौद्ध अनुयायी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात. या दिवशी बुद्ध विहारे रंगीबेरंगी पताका, फुलांनी सजवली जातात. बौद्ध बांधव यादिवशी गोडधोडाचे जेवण करून आपले मित्र नातेवाईक यांना घरी आमंत्रण देतात. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सर्व बौद्ध भिक्षु व बौद्ध बांधव बुद्ध विहारात एकत्र येऊन प्रार्थना करतात. बुद्ध मूर्तीजवळ दीपप्रज्वलन करतात. बुद्धांची शिकवण अंगिकारण्याचा संकल्प करतात. बुद्धांनी सांगितलेल्या मार्गाने चालण्याचा निश्चय करतात. गौतम बुद्ध हे भारताचे सर्वोत्तम भूमिपुत्र आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांनी त्यांना मिळालेले ज्ञान समाजापर्यंत नेऊन एका वेगळया बदलाची पायाभरणी केली. त्याकाळात अंधश्रद्धा, कर्मकांड पाखंड यांनी उच्चांक गाठला होता. गौतम बुद्धांनी यावर प्रहार केला. नरबळी, पशुबळी, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना त्यांनी कडाडून विरोध केला. गौतम बुद्धांनी मानव कल्याणाचा उपदेश केला. लोकांमध्ये असलेल्या स्वर्ग,नरक या भंपक गोष्टींबद्दल असलेली भीती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना चार आर्यसत्य सांगितली ती चार आर्यसत्य आचरणात आणल्यास मानवाचे जीवन आनंदमय होऊ शकते. ती चार आर्य सत्य म्हणजे

१) मानवाला दुःख असते.

२)दुःखाला कारण असते.

३ ) दुःखाचे निवारण करता येते.

४) दुःख कमी करण्याचे उपाय आहेत.

मानवी जीवनातील दुःख निवारण्यासाठी बुद्धांनी आठ मार्ग सांगितले आहेत. यम, नियम, आसन, प्राणायम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी. गौतम बुद्धांनी आयुष्यभर शील, समाधी आणि प्रज्ञेचा मार्ग शिकवला. त्यांनी करुणा विकसित करण्याचा आणि समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. आज बुद्ध पौर्णिमेपासून सर्वांनी शिलाचे काटेकोरपणे पालन करून आपली काया, वाचा व मनाची कृती निष्कलंक राहील असा संकल्प करावा. सर्व नागरिकांनी तथागत गौतम बुध्दांच्या मार्गाने चालावे. गौतम बुद्धांनी दाखवलेला मार्ग हाच मानव मुक्तीचा मार्ग आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात



### इन्स्टाग्रामवरील ओळखीतून डोंबिवलीतील महिलेच्या घरात भामट्याकडून चोरी

● डोंबिवली – इन्स्टाग्रामवर झालेल्या ओळखीतून सुदृढ शरीरासाठी चांगली माहिती देणारा एक इसम डोंबिवलीतील एका महिलेच्या घरी आला. सुदृढ शरीर, त्यासाठी घ्यावयाची काळजी याविषयीची माहिती देत असताना महिलेला डुलकी लागली. या संधीचा गैरफायदा घेत घरी आलेल्या इसमाने महिलेच्या घरातील चार लाख ४७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.

या इसमाने गुंगीचा फवारा फवारून किंवा काही हातचलाखी करून महिलेला बोलण्यात गुंतवून त्यांना भुरळ घालून ही चोरी केली आहे का, या दिशेने या प्रकरणाचा पोलीस तपास करत आहेत. मनीषा चंद्रहास हळदनकर असे तक्रारदार महिलेचे नाव आहे. त्या डोंबिवली पश्चिमेतील घनश्याम गुप्ते छेद रस्त्यावरील जयहिंद कॉलनी भागात राहतात. सोमवारी रात्री साडेअकरा ते मंगळवारी सकाळी साडेआठ वेळेत हा चोरीचा प्रकार घडला आहे. मनीषा हळदनकर यांनी याप्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलीस उपनिरीक्षक ए. के. आंधळे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा



ठाणे : भिवंडी येथील अन्सारी मैदान येथील मतदान केंद्रावर सोमवारी केंद्रीय मंत्री तथा भिवंडी लोकसभेचे भाजपचे उमेदवार कपिल पाटील यांनी पोलीस आणि मतदार केंद्राबाहेरील नागरिकांना दमदाटी, शिवीगाळ केली होती. याप्रकरणी त्यांच्याविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. समाजमाध्यमावर चित्रीकरण प्रसारित झाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

अन्सारी मैदान परिसरातील एका शाळेमध्ये मतदान केंद्र होते. या केंद्रावर बोगस मतदान सुरू असल्याचा आरोप कपिल पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी केला होता. त्यानंतर कपिल पाटील स्वत: या मतदान केंद्रावर आले. त्यांनी येथील बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना दमदाटी केली होती. तसेच मतदान केंद्राबाहेरील नागरिकांना देखील दमदाटी आणि शिवीगाळ केली. याप्रकरणाचे चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित झाले. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात पोलिसांनी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर कपिल पाटील यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# डोंबिवलीत गोळवलीतील चहा विक्रेत्याला त्रिमूर्तीनगरमधील गुंडांनी लुटले




● डोंबिवली – डोंबिवलीमधील एका ७२ वर्षांच्या चहा विक्रेत्याला त्रिमूर्तीनगर झोपडपट्टीतील गुंडांनी मंगळवारी दिवसाढवळ्या दादागिरीचा अवलंब करून लुटल्याचा प्रकार उघडकीला आला आहे. चहा विक्रेत्याने याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

कल्याणमध्ये आंबिवली जवळील इराणी वस्तीत जसे काही अट्टल चोर राहतात. त्याप्रमाणे मागील काही वर्षांपासून डोंबिवलीतील त्रिमूर्तीनगर झोपडपट्टीत अनेक गुन्ह्यातील आरोपी याठिकाणी चोऱ्या करून वास्तव्याला येतात. सर्वाधिक चोरटे पोलिसांनी या वस्तीमधून पकडले आहेत. त्यामुळे त्रिमूर्तीनगर झोपडपट्टीच्या प्रवेशव्दारावर पोलीस चौकी सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. यासंदर्भात नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांना एक निवेदन देण्याचा निर्णय घेतला आहे.

गुलाबी पुजारी (७२) असे चहा विक्रेत्याचे नाव आहे. शिळफाटा रस्त्यावरील गोळवली गाव हद्दीत ते चहा विक्रीचा व्यवसाय करतात. गणराज सुरेश छपरवाल (२५) आणि अन्य एक जण अशी आरोपींची नावे आहेत. ते डोंबिवलीतील शेलार नाक्यावरील त्रिमूर्तीनगर झोपडपट्टीत राहतात. पोलिसांनी सांगितले, गुलाबी पुजारी हे मंगळवारी सकाळी गोळवली येथील आपल्या चहा विक्रीच्या दुकानात चहा विक्रीचा व्यवसाय करत होते. दुकानात सकाळची वेळ असल्याने किरकोळ गर्दी होती. यावेळी दुकानात आरोपी गणराज छपरवाल आणि त्याचा ३० वर्षांचा साथीदार आला. ते चहा पिण्यासाठी आले असावेत म्हणून गुलाबी पुजारी याने त्यांना बसण्यास सांगितले. पण त्यांनी चहा न घेता आम्हाला पिण्याच्या पाण्याची बाटली पाहिजे अशी मागणी केली.

गुलाबी मंचकावरून पाण्याची बाटली काढत असताना अचानक आरोपी गणराज छपरवाल याने चहा विक्रेता गुलाबी यांच्या मानेवर थाप मारून त्यांच्या गळ्यातील ९० हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी हिसकावली. काही कळण्याचा आत हा प्रकार घडला. सोन्याची साखळी हातात येताच गणराजसह त्याचा साथीदार तेथून पळून गेले. मानेला हिसका का बसला म्हणून पुजारीने मानेला हात लावला तर सोनसाखळी गायब असल्याचे दिसले. गुलाबीने चोर म्हणून ओरडा केला, पण तोपर्यंत आरोपी त्या भागातून गायब झाले होते. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. साहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप गोरे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## आनंद दिघे यांच्या बहिणीला पॅरालिसिसचा अटॅक, रुग्णालयात दाखल



● ठाणे : शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या ज्येष्ठ भगिनी अरूणा गडकरी यांना पॅरालिटीक अटॅक आल्याने त्यांच्यावर ठाण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मंगळवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रुग्णालयात त्यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच त्यांना पुढील उपचारासाठी ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्याची सूचना शिंदे यांनी दिली. शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या अरुणा गडकरी या ज्येष्ठ भगिनी आहेत. त्या ठाण्यात कुटुंबासह वास्तव्यास आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांना पॅरालिटीक अटॅक आला होता. त्यामुळे त्यांच्यावर नितीन कंपनी येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. अरुणा गडकरी यांची प्रकृती अस्वस्थ असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळाल्यानंतर त्यांनी मंगळवारी रात्री रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्रकृती बाबतची माहिती डॉक्टरांकडून घेतली.

### प्रकृतीत सुधारणा - एकनाथ शिंदे

■ **अरुणा गडकरी यांना पॅरालिटीक अटॅक आलेला आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती घेण्यासाठी आलो होते. डॉक्टरांसोबत चर्चा केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी ज्युपिटर या रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेतला आहे. अरुणा गडकरी यांची प्रकृती स्थिर आहे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ज्युपिटर रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असल्याने तिथे उपचार करणे सोयीचे असल्याचेही त्यांनी सांगितले.**

## दिवा येथील ठाणे पालिकेच्या कचराभूमीवर बेकायदा चाळी



● डोंबिवली – दिवा शहराजवळील ठाणे महानगरपालिकेच्या कचराभूमीवर कचऱ्याचे सपाटीकरण करून भूमाफियांनी बेकायदा चाळी उभारण्याचा जोरदार धंदा उघडला आहे. या कचराभूमीवर जागा हडप करण्यासाठी भूमाफिया हिरव्या जाळ्या लावून, पत्रे लावून कचराभूमीवरील भौगोलिक क्षेत्रावर आपला हक्क दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत.

या कचराभूमीच्या एका बाजुला यापूर्वीच बेकायदा चाळी भूमाफियांनी बांधल्या आहेत. या चाळींमध्ये रहिवास आहे. या चाळींच्या तीन ते चार फुटापर्यंत कचऱ्याच्या सपाटीकरणाचे ढीग लावण्यात आले आहेत. तरीही रहिवासी या भागात राहत आहेत. पावसाळ्यातील चार महिने कचराभूमी परिसर पूर्णपणे पाण्याखाली असतो, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. हे रहिवासी पालिकेच्या मुख्य जलवाहिनीवरून चोरून पाणी वापरतात.

दिव्याची कचराभूमी सुरू करू नका. ही कचराभूमी शहराजवळ आहे. या कचराभूमीमुळे दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे, अशा स्थानिकांच्या तक्रारी आहेत. हा विषय पुढे रेटून स्थानिक राजकारणी या विषयाचे राजकारण करून दिव्याची कचराभूमी सुरू होऊ नये यासाठी विविध स्तरावर प्रयत्नशील आहेत. कचराभूमी पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत झाली नाही तर या कचराभूमीवर मोकळी जागा आपल्या ताब्यात रहावी म्हणून स्थानिक भूमाफिया या कचराभूमीवर हिरव्या जाळ्या विविध भागात लावून ती जागा आपल्या मालकीची असल्याचा दावा करत आहेत. याठिकाणी सुरुवातीला पत्र्याचा निवारा उभारला जातो. तेथे पालिकेने कारवाई केली नाही की मग तेथे पत्रे, विटांचे पक्के बांधकाम करून बेकायदा चाळी, गाळे बांधण्याची कामे केली जातात, असे स्थानिकांनी सांगितले.

## दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात प्रतिज्ञा




● नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार यांच्यासमवेत उपस्थित समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री. किसनराव पलांडे, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, सहा. आरोग्य अधिकारी श्रीम. रत्नप्रभा चव्हाण, लेखाधिकारी श्री. मारोती राठोड, प्रशासकीय अधिकारी श्री. उत्तम खरात, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण कटके तसेच इतर अधिकारी, कर्मचारी यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली. यावेळी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमालिका अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. “आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याव्दारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करीत आहोत” अशी प्रतिज्ञा घेत महापालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाने “आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू, तसेच मानवी जीवित आणि मूल्य धोक्यात आणणा-या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करू” असा दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञेचा मजकूर सर्वांनी सामुहिकरित्या म्हटला.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत आर्किटेक्चर अभियंता युवकाचा मृत्यू



● भिवंडी : ठाणे भिवंडी रस्त्यावर अज्ञात ट्रकच्या धडकेत व्यवसायाने आर्किटेक्चर अभियंता असलेल्या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तन्मय राजेश चव्हाण असे मयत युवकाचे नाव आहे...

तन्मय चव्हाण हा सकाळी सात वाजताच्या सुमारास आपल्या दुचाकी वरून भिवंडी येथे घरी परतता असताना अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील अज्ञात वाहन बेदरकार पणे चालवून दुचाकीस धडक दिल्याने तन्मय याचा जागेवरच अती रक्तस्राव झाल्याने मृत्यू झाला आहे. या प्रकरणी वडील राजेश चव्हाण यांनी दिलेल्या तक्रार वरून नारपोली पोलिस ठाण्यात अज्ञात वाहन चालक विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ठाणे - ठाण्यात उन्हाचा पारा वाढला आहे यामुळे नागरिकांना चांगलेच चटके सहन करावे लागत होते

# स्टॅम्प ड्युटीने महसूल देणारे नागरिक उन्हाच्या झळांनी हैराण



● कल्याण : कल्याण शहरातील सिंधीकेट येथील दुय्यम निबंधक कार्यालयात अधिकारी एअर कंडिशनरच्या केबिनमध्ये बसत कारभार हाकत असून आपले घराचे रजिस्ट्रेशन करणाऱ्या नागरिकांना 40- 42 डिग्री सेल्सिअसच्या तापमानात ताटकळत उभे राहावे लागत आहे. करोडो रुपयांचा महसूल स्टॅम्प ड्युटी मधून शासनाला मिळत असताना रजिस्ट्रेशन करण्यासाठी कार्यालयात येत असणाऱ्या नागरिकांना उन्हाच्या झळा खात ताटकळत बसावे लागत आहे.

कल्याण व आजूबाजूच्या ठिकाणाहून दुय्यम निबंधक कार्यालयात घरांचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी या कार्यालयात दररोजची मोठी गर्दी असते. रजिस्ट्रेशनच्या स्टॅम्प ड्युटीतून राज्य शासनाला करोडो रुपयांचा महसूल येथे मिळत आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत येथे रजिस्ट्रेशनचे काम सुरू असल्याचे माहिती आहे. एकीकडे कडक उन्हाळयामुळे अंगाची लाईलाई होत असून दुय्यम निबंधकांच्या कार्यालयाबाहेर रजिस्ट्रेशन करणारे नागरिक उकाड्यात घामाने मेटाकुटीला आल्याचे दिसत आहे.

■ दुय्यम निबंधक कार्यालयात एकीकडे दलालांचा मोठा सुळसुळाट झाल्याची चर्चा असून दलाला मार्फत गेलेले रजिस्ट्रेशनला प्रथम प्राधान्य येथे दिले जात आहे. त्यामुळे दलालाकडून आलेल्यांना येथे जास्त वेळ थांबावे लागत नसून अन्य जणांना तसेच वकिलांना देखील रजिस्ट्रेशनच्या कामात जाणीवपूर्वक रखडवले जात आहे. ऐन कडक उन्हात दुय्यम निबंधक एसी केबिनमध्ये बसून रजिस्ट्रेशनचा कारभार हाकत असून सर्वसामान्य नागरिकांना मात्र दुय्यम निबंधकाच्या केबिन बाहेरील जागेत गरम फॅनच्या हवेत बसावे लागत आहे.

■ राज्य शासनाला रजिस्ट्रेशनच्या माध्यमातून स्टॅम्प ड्युटी चा महसूल करोडोच्या रूपात मिळत आहे. नागरिकांकडून महसूल मिळत असताना उकाडाच्या दिवसात कुलर किंवा एसी बसविण्यासाठी दुय्यम निबंधक प्रयत्न का करत नाही असा सवाल येथे उपस्थित केला जाऊ लागला आहे. यासंदर्भात दुय्यम निबंधक अधिकाऱ्यांशी प्रतिक्रियेकरिता संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

## पाईप लाईनमध्ये आढळला मृत कबुतर

● कल्याण : सध्या कडक उन्हाळयामुळे धरणातील पाणी पातळी खालवली असून अनेक भागात पाणी टंचाई भेडसावत आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र ३० मल्हार नगर येथील सुयोग सोसायटी व स्नेहांकित मित्र मंडळ परिसरात गेल्या चार ते पाच दिवसांपासून पाणी येत नव्हते. याबाबत मनसेचे विभाग अध्यक्ष कपिल पवार यांनी शनिवारी केडीएमसी प्रशासनाकडे तक्रार केली असता आज केडीएमसी कर्मचाऱ्यांनी याठिकाणी पाण्याची पाईपलाईन दुरुस्तीसाठी खोलली.

यावेळी पाईप लाईनचे काम केले असता मृत कबुतर पिण्याच्या पाण्यातून बाहेर काढले. यामुळे स्मार्ट सिटी कल्याण मध्ये स्मार्टपाणी विभागाचा गलथान कारभार समोर आला असून पाणी विभागाने वेळच्यावेळी पाईप लाईनची देखभाल दुरुस्ती करणे गरजेचे असल्याची मागणी मनसेचे विभाग अध्यक्ष कपिल पवार यांनी केली आहे. तर अशा प्रकारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून याला सर्वस्वी केडीएमसी प्रशासन जवाबदार असल्याचे पवार यांनी सांगितले.



## अमेरिकेने दिली आगमनाची नांदी; बांगलादेशवर साकारला शानदार विजय



आगामी वर्ल्डकपपूर्वी टी-२० क्रिकेटमध्ये अमेरिकेने बांगलादेश संघाला पराभूत करत मोठा ठसा उमटवला आहे. टी-२० क्रमवारीत १९व्या क्रमांकावर असलेल्या युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका म्हणजेच यूएसए क्रिकेट संघाने टेक्सासमध्ये जगातील नवव्या क्रमांकावर असलेल्या बांगलादेशचा पाच विकेट्सने पराभव करून सर्वांनाच चकित केले. अमेरिकेने बांगलादेशचा ५ गडी राखून पराभव केला. अमेरिकेने बहुतेक वेळ सामन्यात आपले वर्चस्व कायम राखले आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

२०२१ मध्ये आयर्लंडविरुद्धच्या विजयानंतर अमेरिकेचा हा दुसरा टी२० विजय आहे. यूएसए आणि बांगलादेश हे दोन्ही संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच आमनेसामने आले होते आणि पहिल्याच सामन्यात यूएसएने बांगलादेशला हरवून इतिहास रचला. यंदाच्या टी-२० विश्वचषकातही अमेरिकेचा संघ सहभागी झाला आहे. ंगलादेशविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात अमेरिकेचा भारतीय वंशाचा कर्णधार मोनांक पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशने निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून १५३ धावा केल्या होत्या. एक वेळ अशी होती जेव्हा बांगलादेशची धावसंख्या ११.४ षटकांत ४ विकेट गमावत केवळ ६८ धावा होती. येथून तौहीद हृदय आणि महमुदुल्लाह यांनी संघाचा डाव सावरला आणि संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. जिथे तौहीदने ४७ चेंडूत ५८ धावा केल्या. तर महमुदुल्लाहने २२ चेंडूत ३१ धावांची चांगली खेळी केली. अमेरिकेकडून स्टीव्हन टेलरने सर्वाधिक २ विकेट घेतले. सौरभ नेत्रावलकर, अली खान आणि जसदीप सिंग यांना प्रत्येकी एक विकेट मिळवण्यात यश आले. भारताचा १९ वर्षाखालील माजी क्रिकेटपटू हरमीत सिंगने १५४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेसाठी विजयी धावा केल्या. सलग तीन षटकार मारून त्याने सामना अमेरिकेकडे वळवला. १३ चेंडूत नाबाद ३३ धावा केल्यानंतर तो खेळ संपेपर्यंत मैदानावर राहिला. त्याने कोरी अँडरसनसोबत सहाव्या विकेटसाठी भागीदारी करताना ४.४ षटकांत ६२ धावा जोडल्या. कोरी अँडरसनही ३४ धावा करून नाबाद राहिला. बांगलादेशकडून मुस्तफिजुर रहमानने २ विकेट घेतले. शरीफुल इस्लाम आणि रिशाद हुसेन यांनाही प्रत्येकी १ विकेट मिळाली. अमेरिकेकडून स्टीव्हन टेलरने २८ आणि अँड्र्यू गूसने २३ धावांचे योगदान दिले. अमेरिकेसाठी बांगलादेशवर मिळवलेला विजय त्यांच्यासाठी आगामी विश्वचषकाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

# आडवी तिडवी सुटलेली ढेरी कमी करते शेवग्याच्या पानांची पावडर



भारतीय आयुर्वेद शास्त्रात अनेक औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पतींबद्दल सांगिले आहे. या औषधी वनस्पती आपल्या अनेक आजारांवर जालिम उपाय आहेत. त्यापैकीच एक आहे शेवग्याच्या शेंगांचे झाड.

शेवग्याच्या झाडाची पाने आकाराने छोटी आणि चवीला वेगळी असतात. या झाडाला मॉरिंगा ऑलिफेरा असेही म्हणतात. चव आणि पौष्टिकतेने समृद्ध शेवगा हे केवळ आरोग्यदायी अन्नच नाही तर त्याची फुले, पाने आणि फळे खूप फायदेशीर आहेत.

मोरिंगा पाणी हे पोषक तत्वांचे पॉवरहाऊस आहे, जे आरोग्यास अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. पोषक तत्वांनी युक्त मोरिंगा पाण्याचा आहारात दररोज सेवन केल्यास ते आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते.

शेवग्याच्या पानांमध्ये कॅल्शियम, पोटॅशियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि जस्त मुबलक प्रमाणात असते. या पानात पालकापेक्षा तिप्पट लोह असते.

शेवग्याच्या पानांच्या पावडरीचे पाण्यातून सेवन केल्याने आरोग्यासाठी खूप फायदे होतात. शेवग्याचे पानांचे पाणी अँटिऑक्सिडेंट गुणधर्मांनी समृद्ध आहे आणि ऑक्सिडेटिव्ह तणावाचा सामना करण्यास आणि मुक्त रॅडिकल्सपासून शरीराचे संरक्षण करण्यास मदत करते.

शेवग्याच्या पानांच्या पावडरीचे पाणी सेवन केल्याने वृध्दत्वाची लक्षणे दूर होतात तज्ज्ञांच्या मते, मोरिंगा पाणी सूज कमी करते. क्वेर्सेटिन आणि क्लोरोजेनिक ॲसिड सारख्या संयुगे समृद्ध असलेल्या मोरिंगा पाण्याचे नियमित सेवन केल्याने सूज कमी होण्यास मदत होते.

**वजन कमी करते**

वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी शेवग्याची पावडर लाभदायी आहे. वजन कमी करण्यासाठी तुम्ही डिटॉक्स वॉटर पित असाल तर आजपासून शेवग्याच्या पानांचा वापर करा. उठल्यानंतर शेवग्याच्या पावडर घातलेले कोमट पाण्याचे तुम्ही सेवन करा. ज्यामुळे आडवे-तिडवे सुटलेले पोट कमी होईल.

**मधुमेहावर आहे गुणकारी**

मधुमेही रुग्णांनी रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी रोज मोरिंगा पाण्याचे सेवन करावे. शेवग्याचे पाणी नैसर्गिकरित्या रक्तातील साखर सामान्य करते. मोरिंगाच्या पानांमध्ये आयसोथिओसायनेट नावाचे रासायनिक संयुग आढळते, जे मधुमेह नियंत्रित करण्यास मदत करते.

शेवग्याच्या झाडांची हिरवी पाने क्लोरोफिलमध्ये समृद्ध आहेत. क्लोरोफिल त्याच्या डिटॉक्सिफिकेशन गुणधर्मांसाठी ओळखले जाते जे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकते आणि शरीराला विषमुक्त करते.

लसूण, काकडी, फ्लॉवर, गाजर, शेवगा, कैरी स्वस्त

**शेवग्याचे पाणी कसे तयार करावे**

शेवग्याचे पाणी तुम्ही घरी सहज तयार करू शकता. हे करण्यासाठी ताजी शेवग्याची पाने किंवा त्याची पावडर पाण्यात मिसळा. ही पाने शिजवून घ्या आणि नंतर गाळून घ्या. हे पाणीएक हायड्रेटिंग पेय आहे जे शरीराला हायड्रेट करते आणि शरीरातील अशुद्धता काढून टाकते. त्याची चव वाढवण्यासाठी तुम्ही त्यात लिंबाचा रस घालून सेवन करू शकता.

## भाजपकडून भोजपूरी स्टार पवन सिंहची हकालपट्टी, वाचा टोकाच्या निर्णयामागील कारणं



एनडीएच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध अपक्ष उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक लढवल्याबद्दल बिहार भाजपने भोजपुरी गायक पवन सिंग यांची हकालपट्टी केली. पवन सिंह यांनी करकट लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय यापूर्वी जाहीर केला होता.

दरम्यान लोकसभा निवडणूक जाहीर झाली त्यावेळी भाजपने भोजपूरी गायक पवण सिंह यांना पश्चिम बंगालमधून तिकिट जाहीर केले होते. पण तिकिट जाहीर झाल्यानंतर काही दिवसांतच पवण सिंह यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता.

पुढे 9 मे रोजी पवण सिंह यांनी आपल्या गृहराज्यातून बिहारमधून लोकसभेसाठी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. सिंह यांनी करकट लोकसभा मतदारसंघातून आपला अर्ज दाखल केला, जिथे राष्ट्रीय लोक मोर्चाचे माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह हे एनडीएचे उमेदवार म्हणून उभे राहणार होते.

## दिनविशेष

**घटना**

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.

१९९८ : मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.

१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.

१९९०: लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.

१९७६ : होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.

**जन्म**

१९६७: राम नरेश रावत भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: ४ सप्टेंबर २०२२)

१९४९ : गोपाल निमाजी वानवती भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २ सप्टेंबर २०१४ )

१९४८: नित्यानंद हळदीपूर - मैहर घराण्याचे बासरी वादक

१९३२ : राज मोहन वोहरा लेफ्टनंट जनरल महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन: १४ जून २०२०)

१९२३ : आत्माराम गोविंद भेंडे मराठी नाट्य अभिनेते व दिग्दर्शक

१९१२: पन्नालाल पटेल - गुजराथी कथा-कादंबरीकार - ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: ६ एप्रिल १९८९)

१९०९ : एडविन एच लँड - पोलाराईड कॉर्पोरेशनचे सहसंस्थापक (निधन : १ मार्च १९९१)

**निधन**

२०२२: पार्थ घोष - पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२ : दुर्गाबाई भागवत - जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१ : विभावरी शिरूरकर - लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१ : प्रेम धवन - भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९८: ॲलन मॅक्लिओड कॉर्मेक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २३ फेब्रुवारी १९२४)

१९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

१९९१: मनमोहन नातू - लोककवी गोपाळ नरहर तथा (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

## 'पुष्पा' फेम अल्लू अर्जुनच्या साधेपणाने वेधलं लक्ष, पत्नीसह ५ स्टार हॉटेलमध्ये नाही तर ढाब्यावर जेवला



दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील सुपरस्टार अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. चित्रपटाच्या टीझर आणि पहिल्या गाण्यामुळे प्रेक्षकांमधील उत्सुकता वाढवली आहे. त्यामुळे सतत 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाची चर्चा सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाविषयी नवनवीन अपडेट समोर येत आहेत. अशातच 'पुष्पा' फेम अल्लू अर्जुनचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. या फोटोने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

अभिनेता अल्लू अर्जुनच्या फॅन पेजवर हा फोटो शेअर करण्यात आला आहे. या फोटोमध्ये अल्लू अर्जुन पत्नी स्नेहा रेड्डीसह रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका ढाब्यात जेवताना दिसत आहे. एकाबाजूला अल्लू अर्जुन फोन बोलताना पाहायला मिळत असून दुसऱ्याबाजूला त्याची पत्नी स्नेहा खाताना दिसत आहे. या फोटोमधील दोघांच्या साधेपणाने सगळ्यांची मनं जिंकली आहे.

अल्लू अर्जुनचा हा साधेपणा पहिल्यांदा दिसत नसून अनेकदा पाहायला मिळाला आहे. यापूर्वी अभिनेता एका छोट्या दुकानात डोसा खाताना दिसला होता. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला होता. डोसा खाल्यानंतर दुकान मालकाला १००० रुपये अभिनेत्याने दिले होते. पण मालकाने अर्जुनकडून पैसे घेण्यास नकार दिला.

दरम्यान, अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २: द रुल' चित्रपटात अभिनेत्री रश्मिका मंदाना व फहाद फाजिल पुन्हा पाहायला मिळणार आहेत. १५ ऑगस्टला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. सुकुमार दिग्दर्शित 'पुष्पा २: द रुल' चित्रपटावर एकूण खर्च ५०० कोटी रुपये झाल्याचं म्हटलं जात आहे. माहितीनुसार, 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाचे डिजिटल स्ट्रीमिंग राइट्स ॲमेझॉन प्राइमने ३० कोटी रुपयांमध्ये खरेदी केले आहेत. शिवाय नेटफ्लिक्सने देखील या चित्रपटाचे डिजिटल स्ट्रीमिंग राइट्स खरेदी केल्याचं म्हटलं जात आहे. ॲमेझॉन प्राइमने दिलेल्या रक्कमेपेक्षा तीन पट रक्कम नेटफ्लिक्सने 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाच्या डिजिटल स्ट्रीमिंग राइट्ससाठी दिली आहे.

## घरीच फुलवा तुमचा मळा, गच्चीवरील बाग कार्यक्रमास बागप्रेमींचा प्रतिसाद



'टेरेस फार्मिंग/ किचन गार्डनिंग व बायो एन्झाईम प्रक्रिया तंत्रज्ञान' या विषयावर भानुदासराव चव्हाण सभागृहामध्ये एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. वुई फॉर एन्व्हायरमेंट, द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स तसेच देवगिरी इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट यांच्या वतीने उपक्रम घेण्यात आला.

अध्यक्षस्थानी द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स कॉलेजचे प्राचार्य उल्हास शिंदे होते. प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तज्ज्ञांनी बागकाम हे मानसिक शांती व समाधानासाठी किती आवश्यक आहे याकडे लक्ष वेधले.

दैनंदिन जीवनामध्ये आणि गच्चीवरील बागेमध्ये बायोएंझाइम व त्याचा वापर याविषयी दीपक मोताळे (नांदेड) यांनी मार्गदर्शन केले. गच्चीवरील बाग काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाय आणि व्यवस्थापनासाठी जीवामृत आणि नैसर्गिक संसाधनांचे महत्त्व या विषयावर तुषार देसाई (मुंबई) यांनी माहिती दिली.

''शहरातील गर्दीतील प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेल्या नागरिकांना तणावमुक्त जीवनशैलीची गरज आहे यावर गच्चीवरील बागकाम हा एक उत्तम पर्याय आहे'', असे ठोंबरे म्हणाले. ''घरातील कचऱ्यापासून खत तयार करता येते.

यातून आपण घरच्या घरी निर्माण होणारा ताजा आणि विषमुक्त भाजीपाला, फुले, फळ याचे उत्पादन करू शकतो'', असे शिंदे म्हणाले. यावेळी डॉ. गणेश कुलकर्णी लिखित 'गच्चीवरील बागेचे महत्त्व व शहरी जीवनासाठी एक वरदान' या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाला संस्थाध्यक्ष मेघना बडजाते, कमल पहाडे उपस्थित होत्या. डॉ. वर्षा फाळके यांनी सूत्रसंचालन केले. संजय आंबेकर यांनी आभार मानले.

## राशि भविष्य

**मेष** — तुमची ऊर्जा पुन्हा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या कारण अशक्तपणामुळे तुमचे मन कमकुवत होते. तुमची खरी क्षमता ओळखा. अन्यथा तुम्ही शक्ती नाही तर इच्छा गमावून बसाल. आर्थिक जीवनाची स्थिती आज चांगली सांगितली जाऊ शकत नाही आज तुम्हाला बचत करण्यात समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**वृषभ** — तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय. त्यामुळे शंका, निरुत्साह, अश्रद्धा, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल. धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. वडिलांकडून मिळणारी कठोर वागणूक तुम्हाला दु:ख पोहोचवू शकते.

**मिथुन** — तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. जे लोक आत्तापर्यंत पैसा विनाकारण खर्च करत होते आज त्यांना समजेल की, पैश्याची आयुष्यात किती आवश्यकता आहे कारण, आज अचानक तुम्हाला पैश्याची आवश्यकता असू शकते आणि तुमच्या जवळ पर्याप्त धन नसेल.

**कर्क** — तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे. एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन वैयक्तिक प्रश्न सोडवा. तुमची समस्या चव्हाट्यावर आणू नका अन्यथा तुमची बदनामी होण्याची शक्यता अधिक आहे.

**सिंह** — तुमच्या सर्व अडचणी, समस्यांवर हसत हसत मात करणे हाच उत्तम उपाय ठरतो. तुमच्या जीवनसाथी सोबत मिळून आज तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकतात आणि अपेक्षा आहे की, ही योजना यशस्वी होईल. आपल्या घरातील वातावरण बदलण्यापूर्वी तुम्हाला सर्वांचा होकार असल्याची खात्री करा.

**कन्या** — आजच्या दिवशी तुम्ही स्वीकारलेले धर्मादाय काम तुम्हाला मानसिक समाधान आणि आराम मिळवून देईल. आजच्या दिवशी धन हानी होण्याची शक्यता आहे म्हणून देवाण-घेनानीने जोडलेल्या गोष्टींमध्ये जितके तुम्ही सतर्क राहाल तितकेच तुमच्यासाठी चांगले असेल.

**तूळ** — आज तुम्हाला तुमचे आरोग्य राखण्यासाठी आणि चांगेल दिसावे यासाठी प्रयत्न करायला खूप भरपूर मोकळा वेळ मिळेल. अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल. सामाजिक एकत्रिकरण सोहळयात तुमच्या थट्टेखोरपणामुळे तुम्ही लोकप्रिय ठराल.

**वृश्चिक** — सर्वसाधारणपणे आरोग्य चांगले असेल, पण प्रवास कटकटीचा आणि तणावपूर्ण ठरेल. गुंतवणूक करणे श्रेयस्कर आहे, पण त्यासाठी योग्य सल्ला घ्यावा. मित्रमंडळी आणि नातेवाईकांच्यावर आपले निर्णय मते लादू नका, कदाचित तुमच्या आवडीनुसार ते स्वीकारले जाणार नाहीत, आणि ते विनाकारण नाराज होतील.

**धनु** — बाहेरील कामकाज आज तुम्हाला दमवणूक करणारे आणि ताणतणावाचे असेल. तुमच्या जवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि या सोबतच मनात शांती असेल. शाळकरी प्रकल्पासंबंधी धाकटे तुमच्याकडे सल्ला मागतील. आजच्या दिवशी तुम्हाला आजुबाजूला गुलाबाचा सुगंध जाणवेल.

**मकर** — आनंदाने खुशीने परिपूर्ण असा चांगला दिवस. आज कुणी विपरीत लिंगीच्या मदतीने तुम्हाला व्यवसायात किंवा नोकरीमध्ये आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. नातेवाईक/मित्रमंडळी अचानक संध्याकाळी तुमच्या घरी अवतरतील आणि धमाल उडवून देतील.

**कुंभ** — घरगुती काळजी तुम्हाला बेचैन करेल. तुम्ही अतिशय उत्साहपूर्ण नवीन परिस्थितीचा अनुभव घ्याल - त्यामुळे तुम्हाला आर्थिक फायदा संभवतो. चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी चुकीच्या गोष्टी बोलू नका - तुम्ही प्रेम करीत असलेल्या व्यक्ती दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्या.

**मीन** — परिस्थितीवर तुमचे नियंत्रण आले की तुमची चिंता नाहिशी होईल.साबणाच्या फुग्याला स्पर्श करताच तो जसा फुटून जातो तसेच हे असल्याचे तुमच्या लक्षात येईल पैसे मिळविण्याचा नव्या संधी लाभदायक असतील. आपल्या आजी आजोबांशी बोलताना त्यांच्या भावनांना धक्का लागणार याची काळजी घ्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

# नागपूर विद्यापीठ विद्यार्थ्यांना देणार हिंदू धर्म, संस्कृती, हिंदू साहित्याचे धडे




● नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना आता भारतीय ज्ञान परंपरेचे संशोधन तसेच विस्तृत ज्ञान प्राप्त करणे शक्य होणार आहे. याबाबत हिंदू धर्म संस्कृती मंदिरा सोबत विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत जमनालाल बजाज प्रशासकीय भवन येथे आयोजित कार्यक्रमात या सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले.

भारतातील वैविध्यपूर्ण असा प्राचीन ज्ञानाचा विद्यार्थ्यांना अभ्यास करता यावा. तत्कालीन प्रगत भारतीय ज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये 'भारतीय ज्ञान परंपरा' याचा समावेश करण्यात आला आहे. एनईपी २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरा अभ्यासता यावी. यावर अधिक संशोधन करता यावे म्हणून विद्यापीठाने हिंदू धर्म संस्कृती मंदिरा सोबत सामंजस्य करार केल्याचे विद्यापीठाने त्यांच्या निवेदनात सांगितले.

हिंदू धर्म संस्कृती मंदिर या संस्थेकडे प्राचीन ग्रंथसंपदेचे भव्य असे ग्रंथालय आहे. या ग्रंथालयामध्ये साधारणतः ७० हजारांच्या आसपास प्राचीन ग्रंथांचा संग्रह करण्यात आला आहे. या प्राचीन ग्रंथांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरेवर संशोधन करण्यास मदत मिळणार आहे. यामुळे विद्यापीठाने या संस्थेसोबत सामंजस्य करार केल्याचे सांगितले.

या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. राजू हिवसे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश सिंह आणि हिंदू धर्म संस्कृती मंदिर यांच्या वतीने डॉ. सुधाकर इंगळे व मंगेश श्रीराम जोशी यांनी स्वाक्षरी केली आहे.

प्राचीन साहित्यावर संशोधन होणार

भारतीय प्राचीन ज्ञानासंबंधी साहित्य हिंदू धर्म संस्कृती मंदिर त्यांच्याकडे संरक्षित आहे. नागपूर विद्यापीठात भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास करू इच्छिणारे संशोधक तसेच विद्यार्थ्यांना हिंदू धर संस्कृती मंदिर यांच्याकडील प्राचीन भारतीय साहित्य संशोधनाकरिता हाताळता येणार आहे. विद्यापीठ तसेच हिंदू धर्म संस्कृती मंदिर यांच्या दरम्यान शैक्षणिक आदान प्रदान देखील केले जाणार आहे. त्याचप्रमाणे पारंपरिक संशोधन देवान घेवान देखील होणार आहे. या सोबतच परिषदा, सेमिनार, कार्यशाळा, सिम्पोजियम, विविध स्पर्धा, श्रेयांक बदल आधी विविध उपक्रम राबविणे शक्य होणार आहे.

## उजनी पात्रात बोट उलटली, शोधकार्यासाठी एनडीआरएफचे पथक दाखल, सहा जण बेपत्ता



● सोलापूर : उजनी धरण पात्रात मंगळवार (ता.21) रोजी सायंकाळच्या दरम्यान वादळी वाऱ्यात सोलापूर जिल्ह्यातील कुगाव येथून पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील कळाशी कडे प्रवासी वाहतूक करणारी बोट (लांस )उलटली होती.यामध्ये एकुण 7 प्रवासी होते. त्यापैकी 1 जण पोहत नदीच्या किनाऱ्या आला होता मात्र इतर सहा जण बेपत्ता होते रात्री अंधार असल्याने शोध कार्य थांबले होते दरम्यान आज बुधवार (ता.22) रोजी सकाळीच एन डी आर एफ चे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शोधकार्याची मोहीम हाती घेतली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील कुगाव येथून इंदापूर तालुक्यातील कळाशी येथे जाण्या-येण्यासाठी उजनी पात्रात लॉन्च द्वारे वाहतूक केली जाते. मंगळवार रोजी सायंकाळी कुगाव येथून गोकूळ दत्तात्रय जाधव (वय ३०), कोमल गोकूळ जाधव (वय २५), शुभम गोकूळ जाधव (वय दीड वर्ष), माही गोकूळ जाधव (वय ३, रा. झरे, ता. करमाळा, जि. सोलापूर), गौरव डोंगरे (वय 16 वर्षे) सोलापूर येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक असलेले राहुल डोंगरे या प्रवाशांना घेऊन बोट चालक कुगाव येथील अनुराग अवघडे (वय ३५) कळाशीच्या दिशेने निघाला.बोट काही अंतरावर पुढे गेले असता अचानक जोरदार सुटलेल्या वादळ आणि वळवाच्या पावसाने नदीपात्रात लाटा निर्माण झाल्याने बोट पलटी झाली.

## निकाल लागण्या आधिच कोल्हे अन् पाटलांच्या समर्थकांची बॅनरबाजी



● शिरूर: शिरूर लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस व महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांच्यात अत्यंत चुरशीची निवडणूक झाली निवडणुकीची मतमोजणी चार जूनला होणार आहे. निकाला आधीच दोन्ही उमेदवारांच्या समर्थकांकडून मतदारसंघात खासदारपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदनाचे प्लेक्स झळकवले आहे.

या मतदार संघात महायुती व महाविकास आघाडी दोन्ही बाजूने जोरदार प्रचार यंत्रणा राबवली गेली. महाविकास आघाडीकडुन माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार , शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे, माजी मंत्री जयंत पाटील, बाळासाहेब थोरात तर महायुतीकडून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दिग्गज नेत्यांसह राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवरील अनेक नेत्यांच्या सभांनी हा मतदारसंघ ढवळून निघाला होता शिरूर लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान झाले मतमोजणी चार जुन ला होणार आहे.

माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील व खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यात अत्यंत चुरशीची निवडणूक झाली त्यामुळे हा मतदारसंघ संपूर्ण राज्यात चर्चेत आला होता कोण विजयी होणार याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. निवडणुकीची मतमोजणी चार जूनला होणार आहे.

मतदान झाल्यावर दोन्ही बाजूकडून विजयाचे दावे करण्यात येत आहे काही ठिकाणी निकालासंदर्भात लाखो रुपयांच्या पैंजा लागल्या आहे. दोन्ही उमेदवार मतदान झाल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासुन सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होऊ लागले आहे शिवाजीराव आढळराव पाटील यांनी गेली पाच वर्षापासून दर रविवारी जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी लांडेवाडी येथील निवासस्थानी सुरु केलेला जनता दरबार रविवार (दि.19) पासून पुन्हा नियमित सुरु केला आहे.

या जनता दरबारास मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने आले होते. तर डॉ.अमोल कोल्हे यांनीही मतदान झाल्यानंतर लगेचच महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी नाशिक, धुळे, दिंडोरी, मुंबई , वणी या ठिकाणी सभा घेतल्या तर जुन्नर तालुक्यातील आळे येथे कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला होता यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

दोन्ही उमेदवारांच्या कार्यकर्त्यांकडून आमचाच उमेदवार विजयी होणार असल्याचा दावा केला जात आहे. आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आढळराव पाटील यांचा विजय झाल्याबद्दल अभीनंदनाचा फ्लेक्स लावला आहे.

## अंबा नदीतील पाणी पिण्यास अयोग्यच ; प्राथमिक अहवालातून स्पष्ट

### पाण्यात कोलिफोर्म जीवाणूंची मात्रा प्रमाणापेक्षा जास्त



● नागोठणे : अंबा नदीच्या पाटणसई व वजरोली येथील पात्रात घातक रसायनामुळे मोठ्या संख्येने मासे मृत झाल्याची घटना गुरुवारी घडली होती. अंबा नदीच्या पाण्याचे नमुने नागोठणे प्रा.आ. केंद्राकडून तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल आता प्राप्त झाला असून सदरचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष अलिबाग येथील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालयाअंतर्गत असलेल्या उपविभागीय प्रयोगशाळा, रोहा यांनी नोंदविला आहे. सदर भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा प्रयोग शाळेत पाठविण्यात आलेल्या पाण्याच्या प्रति १०० मि.मि. नमुन्यात १०० पेक्षा जास्त कोलिफोर्म आढळून आल्याने अंबा नदीतील हे पाणी थेटपणे पिण्यास अयोग्य व धोकादायक असल्याचे या अहवालात म्हटले आहे.


नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातून अंबा नदीच्या या पाण्यासंदर्भात नागरिकांना सुचना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार साठविलेल्या एक हजार लिटर पाण्यात पाच ग्रॅम टीसीएल पावडरचे द्रावण बनवून वरील निवळी शुद्धीकरणा साठी वापरावी. एक तासा नंतर पाणी पिण्यासाठी वापरू शकता किंवा मेडिक्लोरचे ४ थेंब १० लिटर पाण्यात टाकावेत व अर्ध्या तासा नंतर पाणी पिण्यासाठी वापरा असे सांगण्यात आले आहे.

### नागोठणेसह ४० गावांचा पाणी पुरवठा सुरळीत

पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील अंबा नदी पात्रात केमिकल मिश्रीत सांडपाणी सोडल्यामुळे किंवा कोणी चालकाने केमिकल असलेले टॅंकर धुतल्याने पाणी दुषित होत अंबा नदी पात्रात हेदवली येथील काळव्यापासून पुढे केटी बंधाऱ्यापर्यंत नदी पात्रातील हजारो लहान मोठे मासे मृत झाले होते. नागरिकांच्या आरोग्यावर यामुळे गंभीर दुष्परिणाम होऊ नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून केटी बंधाऱ्यातून नागोठणेसह ४० गावांना होणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद करण्यात आला होता. मात्र नागोठणेसह ४० गावांना या जल स्त्रोतांशिवाय इतर कोणत्याही प्रकारची पाण्याची सोय नसल्याने नागरिकांची चांगलीच गैरसोय होत होती. अशावेळी पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याने विशेष काळजी घेत नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी फक्त दैनंदिन बाहेरील वापरासाठी बंद करण्यात आलेला पाणी पुरवठा केटी बंधाऱ्यातून पूर्ववत सुरळीत चालू करण्यात आला. यावेळी पाणीबाणीला सामोरे जावे लागलेल्या प्रत्येक नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

मात्र प्राथमिक स्तरावर उपविभागीय प्रयोगशाळा, रोहा यांच्या कडून हा अहवाल प्राप्त झाला असला तरी कोकणभवन बेलापूर - मुंबई येथील प्रदूषण नियामक मंडळाच्या प्रयोग शाळेत रासायनिक तपासणीसाठी पाठवलेला पाणी नमुना त्याचा अहवाल अद्याप मिळालेला नाही. लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेमुळे सोमवारी दि. २१ रोजी मुंबईतील प्रयोगशाळेला सुट्टी असल्यामुळे हा अहवाल मिळण्यास उशीर झाला आहे. त्यामुळे टीसीएलने जरी पाण्यातून जंतू मारले तरी जर पाण्यात अजून शरीराला अपायकारक ठरू शकते असे केमिकल असेल तर असे पाणी पिल्याने शरीराला इजा होऊ शकते म्हणून पाण्याचे योग्यरित्या शुद्धीकरण करूनच ते प्यावे अथवा प्राथमिक आरोग्य केंद्रात संपर्क साधावा असे आवाहन नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातून करण्यात आले आहे.

## Man arrested for defacing Delhi Metro coach, signboards with threats to Arvind Kejriwal



● New Delhi - The Delhi Police have arrested 33-year-old Ankit Goel for defacing the walls of a Delhi Metro coach and signboards with threats against Chief Minister Arvind Kejriwal. The CCTV footage from metro stations, which allegedly shows Goel writing on the signboard, led to his arrest.

Goel, who hails from Bareilly, had written messages using abusive language to Kejriwal on the walls of a metro coach and signboards at the Rajiv Chowk and Patel Chowk stations. The message had also raised questions about the Jal Board's audits and the "kickbacks" received by AAP leaders from the liquor policy.

The threats had prompted the Aam Aadmi Party (AAP) to file a letter to the Election Commission of India. The party leaders had also blamed the BJP for "hatching a plan to attack and cause harm to Chief Minister Arvind Kejriwal". "This person's words are like those of the BJP… this has been done at Patel Nagar and Rajeev Chowk Metro stations both inside the platform and outside but no action has been taken yet… we are also going to raise this matter and file a complaint with the Election Commission (EC)… if anything happens to Kejriwal, Modi and BJP will be responsible," AAP Rajya Sabha MP Sanjay Singh alleged.

The BJP hit back, saying if anything happens to Kejriwal, he will be the one responsible for it.

The Delhi Metro, meanwhile, has taken cognisance of the incident, and issued a statement saying, "DMRC expects everyone to refrain from such acts of defacement of Metro properties and urges commuters to not indulge in such activities."

## Mulund, Vikhroli, Ghatkopar among other areas that face water cut for a day

● Mumbai- The BMC on Tuesday said three municipal wards in the eastern suburbs will experience water cuts for 24 hours between Friday and Saturday.

Civic authorities said that owing to the ongoing construction of the Goregaon Mulund Link Road (GMLR), the BMC is diverting an existing 1,200mm pipeline that is currently located in T-ward (Mulund). The BMC authorities said that besides T ward, water supply to the S (Kanjurmarg, Vikhroli) and N (Ghatkopar) wards will also be affected.

"The diversion of the pipeline is important as it currently lies at a spot where a foundation for a flyover of the proposed GMLR corridor will be created. In the process, the connection from the main supply network will be disconnected to prevent any water loss. The work will be initiated around 11.30am on Friday and we plan to complete it by 11.30am next day," said a civic official.

## जिवंत महिला मतदान केंद्रावर ठरली 'मयत'




● पालघर - पालघर लोकसभा मतदार संघातील अनेक मतदारांची नावे याद्यांममधून गायब झाली असतानाच नायगाव पूर्वेच्या जूचंद्र येथे मतदान केंद्रावर गेलेल्या जिवंत महिलेला मयत ठरविले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुशीला राजाराम पाटील असे वयोवृद्ध महिलेचे नाव आहे.

सोमवारी पालघर लोकसभा मतदार संघात मतदान प्रक्रिया पार पडली. मात्र मतदार याद्यामधील घोळ यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले आहे.नायगाव पूर्वेच्या जूचंद्र मतदान केंद्रावर ही नावे यादीत नसल्याने अनेकांना मतदान करता आले नाही. तर दुसरीकडे जिवंत असलेल्या महिलेला मतदार यादीत मयत घोषित केल्याने मतदान केंद्रावर गेलेल्या महिलेला मतदान करता आले नाही.

सुशीला राजाराम पाटील (७२) ही महिला सोमवारी दुपारी बाराच्या सुमारास मतदान केंद्रावर आधारकार्ड व मतदान ओळखपत्र घेऊन मतदान केंद्रावर गेली होती. मात्र मतदान केंद्रात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी तू मयत असल्याने तुला मतदान करता येणार नाही असे या महिलेला सांगण्यात आले आहे.

■ मी जिवंत आहे असे असताना मला मयत घोषित कसे काय केले असा प्रश्न या महिलेने उपस्थित केला आहे. मतदानाचा हक्क प्रत्येक नागरिकाने बजावावा यासाठी निवडणूक आयोगाकडून जनजागृती केली जाते मात्र मतदान केंद्रावर गेल्यावर जर जिवंत व्यक्ती मयत दाखविली जात असेल तर कसे मतदान होईल असा प्रश्न या महिलेच्या कुटुंबीयांनी उपस्थित केला आहे. जिवंत असलेल्या महिलेला मतदान केंद्रावर मयत ठरविल्याने निवडणूक विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा दिसून आला आहे.

## New monorail prototype to join fleet this monsoon



● Mumbai- The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) will deploy a new monorail prototype to its fleet by monsoon. The new rake was recently brought to Mumbai and is presently undergoing trials.

Currently, the 17km monorail route—from Chembur-Wadala to Sant Gadge Maharaj Chowk in Mumbai Central—has eight rakes including one on standby. It currently operates 118 trips at an 18-minute interval. There have however been complaints about the services being delayed due to frequent breakdowns.

In order to address the issue, the MMRDA decided to expand its fleet by adding 10 more rakes. These rakes were purchased from Medha Servo Rail each priced at Rs 58.9 crore. While the first rake was delivered recently, additional deliveries are anticipated within this year, said sources.

With the integration of the new rakes, service frequency is projected to improve to a five-minute interval, nearly doubling the daily service count to 250, according to MMRDA estimates.

The new rakes boast enhanced passenger capacity, accommodating over 600 passengers per train compared to the existing capacity of 500.

Presently, the weekday ridership stands at 16,000, with the weekend figures crossing 10,000. Daily ridership is expected to surge with plans for multi-modal integration and the introduction of new rakes.

